**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,** येवला, यांचे न्यायालयात
(पीठासिन अधिकारी अतिश प्रल्हाद खोल्लम)
कौटुंबिक हिंसाचार कायदा अर्ज क्रमांक ०८/२०२१.

**मनिषा उमेश भाटे, वगैरे २** अर्जदार

**विरुध्द**

**उमेश गुना भाटे, वगैरे** सामनेवाला

**निशानी ०३ खालील आदेश**
(घोषित दिनांकः २६.१०.२०२१)

नि. ०३ वरील अर्ज व सा. वाला यांनी नि.२० वर दिलेले म्हणणे वाचले. अर्जदार व सा. वाले यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**२.** अर्जदाराने सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचार कायदा मधील मुळ अर्जामध्ये दरम्यानची पोटगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ व सा.वाला नं. १ यांचा विवाह संबंध अद्याप कायम आहेत. सामनेवाले हे अर्जदार क्र.१ हिचा शारीरीक व मानसिक छळ करत. दिनांक ०१.०१.२०२१ रोजी सामनेवाले यांनी कोणतेही कारण नसताना, अर्जदाराला शिवीगाळ केली. तिने सामनेवाले यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता, सामनेवाले यांनी तिला अर्जदार क्र.२ व ३ यांच्या समवेत घरातुन हुसकावुन दिले. तेव्हापासून अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ व ३ यांच्या समवेत आश्रित म्हणुन आजरोजी तिच्या माहेरी येवले येथे राहत आहे.

**३.** अर्जदार हिचा सा.वाले यांनी स्वतःहुन त्याग केला असल्याने अर्जदार हिस कौटुंबिक कायद्यान्वये सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल करणे भाग झाले आहे. अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज यामध्ये दोन्ही बाजुचा पुरावा येवून अर्जाचा निकाल होण्यास अवधी लागणार आहे. अर्जदार हिस कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार हिस दररोज लागणारे जिवनावश्यक वस्तु तसेच कपडे याकरीता खर्च करण्याची अर्जदार बेरोजगार असल्याने ऐपत नाही. अर्जदार हिचेवर उपासमारीची वेळ आली आहे. सा.वाला क्र.१ हा रेल्वेत नोकरीस असुन, त्याला रुपये ४०,०००/- इतका पगार मिळतो. तसेच सामनेवाले क्र.२ हे रेल्वेतुन निवृत्त झालेले असुन, त्यांना देखील पेन्शन मिळते. अर्जदार यांना देखील सा.वाला यांच्या राहणीमानाप्रमाणे राहण्याचा हक्क आहे. म्हणून सा. वाला हा अर्जदार यांना दरमहा रक्कम रु. १०,०००/- मिळावे याकरीता अंतरिम पोटगीसाठी अर्ज केला आहे.

**४.** सा.वाला यांनी नि. २० ला अंतरिम अर्जास जबाब देवून अर्जातील सर्व आरोप व कथने अमान्य केलेले आहेत. परंतु अर्जदार व सा. वाले यांच्यातील नातेसंबंध सा.वाला याने नि.क्र. २० मधील जबाबामध्ये परिच्छेद क्र. २० मध्ये मान्य केलेले आहे. अर्जदार हीस सा.वाले हे चांगल्या प्रकारे नांदवित असताना देखील अर्जदाराने सा.वाला यांच्याशी कोणत्याही यथायोग्य कारणाशिवाय भांडणतंटा करुन अंगावरील सर्व सोन्याचांदीचे दागदागिने, कपडेलत्ते घेऊन स्वतःहुन त्याग करुन स्वतःचे इच्छेने व मर्जीने तिचे माहेरी मुंबई येथे राहत आहे. त्यावर सा. वाला यांनी तीस नांदविण्याकामी आणण्याचे अनेकवेळा प्रामाणिक प्रयत्न केले. तसेच दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर निफाड यांचे न्यायालयात हिंदु विवाह अर्ज क्र. २२८/२०२१ हिंदु विवाह कायदा कलम ९ प्रमाणे तसेच जिल्हा न्यायालयात निफाड येथे दिवाणी चौकशी अर्ज क्र. १५/२०२१ हा मुलांचा ताबा मिळणेसाठी दाखल केला आहे. तथापि, अर्जदाराने सा.वालाकडे नांदण्यास येण्याचे प्रत्येकवेळी स्पष्टपणे नाकारले आहे. याउलट सा.वाला नं. १ ची अर्जदाराबरोबर राहुन संसार करण्याची प्रथमपासून इच्छा होती व आजही आहे.

**५.** अर्जदार ही शिवणकाम व ब्युटी पार्लरचे काम शिकलेली असुन, त्यापासून तिला दरमहा रुपये १०,०००/- ते १५,०००/- मिळतात. सबब, अर्जदार क्र.१ हिला उत्पन्नाचे साधन असल्याने ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे. याउलट सा.वाला नं.१ याचे आईवडील वयोवृध्द असुन, वेगवेगळया आजाराने त्रस्त आहेत. सामनेवाला क्र.१ हा वडीलांच्या जागेवर रेल्वे विभागात चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणुन नियुक्त झालेला आहे. सामनेवाला क्र.१ हा किडनी स्टोनचा उपचार घेत आहे. त्यामुळे त्याला स्वतःचा औषधोपचाराचा खर्च येतो. सामनेवाला क्र.१ याला दुसरे कोणते उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे तो नाममात्र पगारात कसाबसा उदरनिर्वाह करतो. अर्जदाराने स्वतःहून सामनेवाला यांचा त्याग केल्यामुळे तिच्या अर्जातील मागण्या मान्य करता येणार नाही. सबब, अर्ज रद्द करावा अशी विनंती केली.

**६.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकता खालील मुद्दा माझे विचारार्थ उद्भवतो, त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत–

| **अ.क्र** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | सकृतदर्शनी सा.वाला यांनी कौटुंबिक छळ केल्याचे अथवा तशी कृती केल्याचे अथवा तशी कृती करण्याची शक्यता अर्जातून दिसून येते काय ? | सकारार्थी |
| **२.** | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजूर |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २:**

७. अर्जदाराने अर्जासोबत स्वतःचे आधार कार्डची पडताळणी केलेली प्रत दाखल केलेली आहे. तसेच मुळ अर्ज व दरम्यानची पोटगी मिळण्याच्या अर्जाच्या पृष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जदाराने अर्जातील मजकूर शपथेवर कथन केलेला आहे. अर्ज दाखल केल्यानंतर संरक्षक अधिकारी मार्फत कौटुंबिक घटना अहवाल मागविण्यात आला. सदर अहवाल नि. ०८ वर आहे. सदर अहवालामध्ये अर्जदाराने सा.वालाशी असलेला नातेसंबंध देऊन अर्जदाराचा सांभाळ करण्यासाठी पैसा न पुरवणे, अन्न, पाणी व वस्त्र न पुरवणे, राहते घर सोडण्यास जबरदस्ती करणे किंवा घराचा कोणताही भाग वापरण्यास किंवा त्यात प्रवेश करण्यास प्रतिबंध किंवा अडथळा निर्माण करणे, अर्जदारास माहिती न देता किंवा तिची संमती न घेता तिच्या किंमती वस्तु तारण ठेवणे, स्त्री धनाची विल्हेवाट लावणे यांसारखे आर्थिक जुलूम तसेच दिनांक ०१.०१.२०२१ रोजी पती, सासु–सासरे, दिर व जाव यांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली, अशा प्रकारची घरगुती जुलूमाची घटना तसेच हुंडा दिला नाही म्हणून अपमान करणे, दर्जा कमी होईल, अपमान होईल किंवा खच्चीकरण होईल असे शेरे मारणे, घर सोडण्यास प्रतिबंध करणे, एखाद्या विशीष्ट व्यक्तीला भेटण्यास प्रतिबंध करणे, जबरदस्तीने लैंगिक संभोग, तुमच्या प्रतिष्ठेस जुलूम करणारे असे लैंगिक कृत्य, शिवीगाळ अशा प्रकारचे लैंगिक जुलूम सा.वाला यांनी अर्जदारांवर केल्याचे अहवालात नमूद आहे. त्याकामी अर्जदाराने महिलांचा घरगुती जुलूमापासून संरक्षण करण्यासंबंधीचा कायदा, २००५ खालील कलम १८ ते कलम २२ प्रमाणे विविध मागण्या केलेल्या आहेत. त्यामुळे सदरचा अहवालाचे अवलोकन केले असता व अर्जदारांचे शपथेवर केलेली कथने व मागणी विचारात घेता सकृतदर्शनी सा.वाला यांनी कौटुंबिक छळ केल्याचे दिसून येते.

८. महिलांचा घरगुती जुलूमापासून संरक्षण करण्यासंबंधीचा कायदा, २००५ कलम २३ अन्वये सकृतदर्शनी सा.वाला यांनी कौटुंबिक छळ केल्याचे दिसून आल्यास कलम १८ ते २२ मधील मागणी अंतरिम आदेशाच्या स्वरुपात अर्जदारास मागता येते व न्यायालयास योग्य तो अंतरिम आदेश पारीत करता येतो.

९. निशानी ०३ मधील अर्जामध्ये अर्जदाराने प्रामुख्याने कलम २० मधील आर्थिक मदतीच्या प्रकाराची मागणी केलेली आहे. अर्जदार व सा.वाला यांचा विवाह अद्याप

अस्तित्वात आहे. त्यांच्यातील नातेसंबंध नाकारलेला नाही. प्रस्तुत अर्जावरुन असे दिसून येते की, अर्जदार यांना आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. सबब, मुळ अर्जाचा गुणदोषावर अंतिम निर्णय होई पावेतो पोटगीच्या स्वरुपाने अंतरिम आदेशाद्वारे सा.वाला क्र. १ यांच्याकडून आर्थिक मदत देण्याचा आदेश पारित करणे गरजेचे वाटते. सबब, सदर आदेश पारित करताना अर्जदार व सा.वाला यांचा राहणीमानाचा दर्जा, उदरनिर्वाहासाठी येणारा रास्त खर्च तसेच सध्याचा महागाई निर्देशांकाचा विचार करता मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष सकारार्थी नोंदविताना मुद्दा क्र. २ साठी खालील आदेश पारित करण्यात येतो :-

## आदेश

**१.** नि. ०३ वरील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

**२.** सा.वाला नं. १ यांना आदेशित करण्यात येते की, सा.वाला क्र. १ यांनी अर्जदार क्र.१ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रु. १,०००/- तसेच अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रुपये ५००/- अंतरिम पोटगी स्वरुपात अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून मुळ अर्जाचा अंतिम निर्णय होईपर्यंत द्यावेत.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च रुपये ५००/- सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ ते ३ यांना एकत्रीत द्यावा.

**स्थळ : येवला**
**दिनांक : २६/१०/२०२१.**

**(अतिश प्रल्हाद खोल्लम)**
**न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,**
**येवला, जि.नाशिक.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी असे प्रमाणित करते की, या PDF न्यायनिर्णय / आदेशामधील मजकूर शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | पी. ए. बारगल. |
| न्यायालयाचे नांव | : | अे.पी. खोल्लम, न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग, येवला, जि. नाशिक. |
| न्यायनिर्णय व आदेशाची तारीख | : | २६.१०.२०२१ |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेले न्यायनिर्णय / आदेशाची तारीख | : | २६.१०.२०२१ |
| न्यायनिर्णय / आदेश PDF अपलोड केल्याची तारीख | : | २६.१०.२०२१ |